# ब नि बा

## साईनाथ चन्ने



# ब नि बा

साईनाथ चन्ने

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

ब नि बा

श्री. साईनाथ चन्द्रभान चन्ने (M.A.B.ed)

प्रा.शिक्षक जि.प.प्रा.शाळा सहस्रलिन्ग

ता. रावेर जि. जळगाव.

मो. न. 9420301309

9049892338

सम्पर्क...

श्री.क्षेत्र गणेशपुरी आश्रमामागे,

तिडी रोड , मु.पो.सवन्दगाव

ता.वेजापुर जि.आरन्गाबाद

इमेल.. sainathchanne@gmail.com

मो..9420301309 / 9049892338

***या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्यचित्रपट किंवा इतर रुपांतर , करण्यासाठीलेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न . . केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते***

***प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:***

**www.esahity.com**

*esahity@gmail.com*

***प्रकाशन** : २३ मार्च २०१७*

*संपादक : अनघा हिरे*

*विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध*

- *आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता*
- *हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.*

# अर्पणपत्रिका.

*माझे हे पहिले शब्दसुमन*
*माझ्या मुलीस जन्मदिवसाची भेट, तसेच माझे आई बाबा व*
*माझ्या आदिवासी विद्यार्थ्यांना*
*सप्रेम भेट....*

## मनोगत..



आदरणीय  वाचक मित्रहो,

मी तसा कवी वा लेखक नाहीच,7 जुले 2015 रोजी मी जळगाव जिल्हयात सहस्रलिंगता या आदिवासी पाड्यावरील मराठी शाळेत रुजु झालो तेथिल वातावरण व जीवनमान बघुन मन हळहळले अन नकळतच चार शब्द कागदावर उमटले अन त्यांना  ई.साहित्य प्रतिष्ठानने आपणा पर्यंत  पोहचवले, माझ्यातला कवी गुण बाहेर आणणा-या  त्या विद्‌यार्थ्यांचा मी ऋणी आहे  हे  लहान  संसाहित्यपुष्प  आपणापुढे आणतांना मनस्वी आनंद  होतो आहे..... या कार्यात मला प्रोत्साहीत करणारी  माझी पत्नी उषा व आमचे मुख्याध्यापक श्री अशोक महाजन सर व सर्व ई साहित्य टीम यांच्याही ऋणात राहतो आहे आपल्या सुचना व प्रतिक्रियांची  वाट बघणारा सदैव आपलाच मित्र

श्री. साईनाथ चंद्रभान चन्ने (M.A.B.ed)

प्रा.शिक्षक जि.प.प्रा.शाळा सहस्रलिंगता.रावेर जि.जळगाव.

मो. न. 9420301309 /  9049892338

संपर्क  श्री.क्षेत्र गणेशपुरी आश्रमामागे,

तिडी रोड ,

मु.पो.सवंदगाव

ता.वैजापुर  जि.औरंगाबाद

इमेल..sainathchanne@gmail.com

## अनुक्रमणिका


- ब नि बा
- आदिवासी
- कोप
- तापीमाय
- माझी शाळा
- मला बी
- देश माझा
- रंग
- प्रश्न
- सेल्फ़ी
- कमीपणा
- दरी
- जात माझी
- पडद्याआड
- निर्झर
- नांगी
- केयीच्या बनात
- लालपरी
- ताडी
- मटका

# ब नि बा

ब नि बा,
बाई नि दा,
आई नि बाबा,
असा माह्या कुणबा;
ब ओरबाडे पाला,
बा फ़ोडी लाकड,
बाई धुंडी गव-या ,
दादा हिंडी धाव-या;
आई टाचे लुगड,
खोल गेल्या पापण्या,
थु म्हणे बाबा,असल्या जीण्या....

शब्दसमज......

ब..आई बा..वडील..

बाई..बहीण..

दा...भाउ..

.आई...आजी...

बाबा..आजोबा...गव-या...शेण.

.धाव-या...डिंक देणारी वनस्पती..

जीण...जगण...

## मी आदिवासी..

*होय मी आदिवासी*
*निधडी छाती*
*वाघापुढ़ती,*
*स्फुर्ती एवढ़ी*
*सिंहाजेवढी,*
*काटक मी*
*हरणापरी,*
*चापल्य माझे*
*वळवळे सापापरी,*
*ह्रदय आकाशासवे*
*धैर्य  धरेपरी,*
*दारिद्र  अठराविश्वे*
*धनीन लंकपार्वतेपरी,*
*पण तरीही बंधु  जगतो*
*धडंग  नटराजापरी....*
*होय मी आदिवासी॥*

*शब्दसमज......*
*धनीन ... पत्नी*
*लंकपार्वती.. एकही दागिणा नसलेली स्री..*
*नटराज.. शिव शंकर.*

# कोप...

*खरच का  हो देव कोपला*

*झोपडीत माझ्या बारमाही नाचला*

*आला पावसाळ्यात*

*फुटल्या कौलारातून निथरला*

*अन हिवाळ्यात*

*कुडातून गारठला*

*उन्हाळ्यात तर*

*आख्खा उकडला*

*सांगा  बापाहो*

*खरच काहो देव कोपला...*

*आता लज्जा नाही मज*

*पैकं द्या म्हणन्याची*

*कारण कणाच माझा मोडला*

*खरच काहो देव कोपला.......*

*शब्दसमज......*

*कौलारातुन..कौलारी छप्पर*

*पैकं .पैसा*

## तापीमाय...

ए तापीमाय थांबना जरा
वळुन बघ ना जरा
केळीच्या बनातुन डोंगरापाड
उजाड रानी नाच ना जरा ...
का..
आवडायला लागले तुला
महलांचे संगमरवर
बघायला नाही का वेळ तुला
आकाश मोजनारे छप्पर.
ए. तापीमाय..
सोड नाद पर्फ्युम चन्द्नाचा
येऊ दे कळवळा निढळाच्या घामाचा
ए तापीमाय थांबना जरा
वळुन बघ ना जरा
केळीच्या बनातुन डोंगरापाड
उजाड रानी नाच ना जरा ...

# माझी शाळा..

डोंगरावर माझी शाळा
लाविते लळा,
पण;
बघता सानुले ,
पानवतील डोळे घळघळा..
सोनुले पाखरे अर्धपोटी
तुटकी हातात पाटी
कौलारु त्यांचे  घरटे
आस्मान न्याहाळते
श्रीमंती  त्यांची
यातुनच कळते...
वाट पाहे माय
देईल कधी मुर्गी अंडे
बाप पोहे नदीत
शोधीत मासे खेकडे...
पण तरीही माझे सानुले
सर्वोत्तम आहे
माझ्यासवे गिरवतात
आज कम्पुटरवर धडे....

# मला बी ..

पाटी न पुस्तक घेउ द्या की र.
मला बी साळला येउ द्या की ..१
आर ये मंग्या  ये गंग्या  ,आर बाबा थांब  जरा..
गणवेस घातला अरे ए.ए.ए
गणवेस घातला जरा टाय तर बांधूद्या की र.
मला बी साळला येउ द्या की ..२

अरे "अ" अननसाचा अन "ए" फोर एपल
सदर्याला गुंड्या  आठ अन बारा पंचे  साठ..
ए पप्प्या थांब  ना चुकेल ना मी वाट,
तुमच्या संग  .खेळु द्या कि र..
मला बी साळला येउ द्या की ..३

ए चींगे  बघ ना शाळा किती सुंदर  ,
बघ ना कम्पुटर अन त्याचा उंदीर  ..
मला बी जग हे बगु द्या की र..
मला बी साळला येउ द्या की ..४

पाटी न पुस्तक घेउ द्या की र.
मला बी साळला येउ द्या की ..५

# देश माझा ऐसा..

होता देश माझा ऐसा
वर्णु मी हो कैसा
येता कुणी अतिथी
चेहरे आनंदून जाती
साधे वाटसरू ही अतिथी देव होती
गोठ्यात गोमाता
दारात नंदी  असती
धनी संगे  धनीनही धरती कसती..
आशिर्वादाला वठलेले हात
तोंडात नाही दात
तरिही ते ब्रम्ह होते क्रुष्णाचे मधुबन होते
शोधतो नकाशात
भारत माझा ऐसा
देवा सांगना रे ,ठेवला कुठे अन विसरलास कैसा.
सांग  शनिला रे
नको वक्रदुष्टी
वरुना दे रे
भरपुर व्रुष्टी
होउ दे सुजलाम
ही सर्व सृष्टी  असु दे देश माझा ऐसा स्वर्गापरी सुंदर  जेसा

# रंग

अर्थ असावा अर्थासारखा
नको काळा ना गोरा
बळीच्या रानाचा रंग राहो हरा. 1

अर्थ असावा एवढा
चरितार्थास पुरो
दानधर्मास उरो
देशकार्यास ना सरो
निर्मळ पाण्याचा रंगन व्हावा भोरा
बळीच्या रानाचा रंग राहो हरा 2

हे देवा कर ना मर्दन
त्या कपुतांचे
अर्थ हव्यासी हैवानांचे
नको रंग कृष्णाचा
नको रंग इंद्राचा
असु दे अष्टगंध टिळा
बळीच्या भाळा
अन देवा,
नसु दे ध्यास अर्थाचा चोरा
बळीच्या रानाचा रंग राहो हरा 3

शब्दसमज......
अर्थ... पेसा

## प्रश्न...

प्रश्न पडला मला हो आज
पडेल केव्हा हा नकली साज
बद्लेल का देश की
फ़क्त मुठभर समाज
प्रश्न पडला मला हो आज १

टपुन बसला वरती बाज
गिळंकृत करन्या भोळे सावज
साथ देईल कुणा ही वेळ
पक्ष्यास कि पारध्यास
प्रश्न पडला मला हो आज २

होतील कुठे कुणाचे हे काज
करतील का हो सगळेच नाज
संभ्रम मनी हो आज
येईल का पुन्हा रामराज
प्रश्न पडला मला हो आज
बद्लेल का देश की
फ़क्त मुठभर समाज
प्रश्न पडला मला हो आज

# सेल्फ़ी

*नाव ठेवले सरल*
*टाके केव्हाही गरल*
*सरकारी नवा फ़तवा*
*विद्यार्थ्यांचा  सेल्फ़ी बनवा १*

*अहो गुरुजी हिंडा  वणवण*
*वस्ती पाडे रानोरान*
*अहॊ शाळेतल्याना झोपवा*
*अन देशोधडीच्याना शिकवा २*

*बर जाऊ द्या गुरुजी*
*शिकवा वा ना शिकवा*
*पण आठवनीने सेल्फ़ी तेवढ़ा पाठवा...३*

# कमीपणा

मी गुरुजी...
बढाई मारली वर्ग़ात
सांगा  कोण हुषार तुमच्यात
कोण म्हणुन दाखवेन तेराचा पाढा
ज्याला येतो त्याने हात वरती काढा
विश्वास न येणार तुम्हा
धक्काच बसला माझ्याही मना
म्हणली ती एकुनचाळिस चा पाढा
अन म्हणते चुक काढा
खजिल झालो
अन नकळत टाळ्या वाजु लागलो
या आदिवासी गुणवत्तेपुढे
सफ़ेद पोषपणा माझा
कमीपणाने लाजला..

# दरी

गगनचुंबी डोंगरमाथा
पाताळलोळी दरी
दरीच्या पाळी खोपट माझी
फ़ळ मुळ झाड पाला
कोंबड खेकड मासे
ही आमची सोजी
चढ्लो असाच डोंगर एकदा
अन पाह्यली शुभ्रता
पाठीत घुस्ल पोट अन घळघळा कापड
अन पुढ्यात माह्या ख़ादितल ढेर
सरकार आम्च ...
न्याहाळ्ले पोट अन पुढ्यातली ढेरी
भासे मज डोंगरमाथा अन खोल खोल दरी...

शब्दसमज......
खादी.... खादीचे कापड
ढेर ..ढेरी ..वाढलेले पोट
सोजी.. गव्हाचे रवा
सरकार ... नेतेमंडळी

# जात माझी

हो जात माझी पावरा
हिंडतो डोंगर दर्या रानीवनी
घेउन लेकरा अन कोकरा
हो जात माझी पावरा १

नका पुसु मज घर माझे
घर तर सातपुडा सारा
तापी माय संगती
अन सोबतीला रानवारा
हो जात माझी पावरा २

नमस्कार ओ साहेब
हिणवु नका हो जरा
संसार माह्या अन मी खरा
भिख नकोय मज सहानुभुतीचि
फ़क्त हीन नजरेच कुत्र तेवढ आवरा
हो जात माझी पावरा ३

## पडद्याआड

*मानल  पडदा प्रथा बंद  केलिय महात्म्यानी*
*तरीही ओढते मी हातभर पडदा*
*आदिवासी माझा राकट चेहरा,नाय सिमेंटी  गोरा,*
*तरीही ओढते मी हातभर पडदा १*

*नाही भीत मी दुनियेच्या नजरेला*
*ना भिती मज नजर टोटक्याची*
*जपते संस्क्रुती आम्हा पवार्यांची*
*आम्हा आदिवासी बांधवांची*
*बरी मी पडद्या आड*
*कारण झाकली मुठ लाखाची २*

# निर्झर

उंच डोंगरदरी
वाहे झरझर
शुभ्र निर्झर
मायबाप जलधर १

भरते घागर जलाची
त्रुष्णा मिटविन्या धन्याची
करन्या चोच वली चिमन्याची २

मालक माझा फ़ोडी पथ्थर
वाट बनवितो चालन्याची
ताकत माझ्या धन्याची
फ़ोडे डोकी दगडाची
कशासाठी...
फ़क्त खळगी भरण्या पोटाची ३

## नांगी

मध माशी गोड मधा पुरती
गाय गोड दुधा पुरती
संस्कृती  आव आणण्यापुरती
जात आम्हा आदिवासींची
फ़क्त पोस्टरपुरती
अन वणवण  आमचि पोटा परी
घुसमट आयुश्याची सलते
विंच्याच्या  नांगेपरी..

# केयीच्या बनात

कष्टतों रानात, केयीच्या बनात
केयीचे घड , झाले डोई जड
वाट नाय धड,गार्यात रुते हो तंगड
धनीन हापते ,बाळ फ़िरे हो पोटात १

गाडी हो भरली अन चिंता सरली
दिनभर कष्टुन धनिन टेकली
चार पेक्यास्तव धन्याची दाढी हो धरली
मायाळु धन्याने मजुरी फ़ेकुन मारली २

अंगी खांदी घेउन चिमनी
खोपटाकडे चालतों आहे
ढळली सांज जरी पण
खोंपट माझी बारे चार माइल लांब आहे ३

# लालपरी

ए कल्या आली का पाहयना
आर लेका कसे तुले कळना
जरा धीर धर ऑ लेके
पहयलिच तर खेप हे
जरा माय कळ सोसना
तुले बाळ हव ना।१

ए आज्जे आली
खडखडत आन खड्ड्यात नाचत
अन गावभर धुराळा उधळत
देवाची क्रुपा झालि
अन लालपरी आली २

अन आज्जी बोल्ली
व्हय र आली बा
जरा लवकरच
पण पोर माही
पडली थंड गारच ३

शब्द समज
लालपरी-- (ऍम्बुलस)

## ताडी

मव्हाची ताडी
अंगअंगझाडी
दोन घोट घेउन
बांधतो स्वप्नात माडी १

फ़ाटली साडी
अन वाढ्ली दाढी
पण घेता ताडी
सब चिंता हवेत सोडी २

# मटका

राजा राणी
एक्का दुरी
दररोजचीच कहाणी
जिंदगी वाहिली पुरी १

मटका सटका
देई खिशास फ़टका
अरे मायबापहो
सोडा नाद अन
कामधंद्याला लटका २

जरा डोक्यात उडु द्या खटका
आई बाप अन कुटुंबास
देण्या सुख वणवण भटका
आयुष्य मोजे घटका
आर म्हणुन नाद सारे झटका ३

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

www. esahity. com